दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ५० रविवार दि.२४ ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## माझ्या पांडुरंगाला मी मटण खाल्लेले चालते:तुम्हाला काय प्रॉब्लेम? सुप्रिया सुळेंचा सवाल; मुख्यमंत्री वेळ देत नसल्याचा आरोप

नाशिक - मी मटण खाल्लेले माझ्या पांडुरंगाला चालते, तर तुम्हाला काय अडचण? असा प्रश्न सुप्रिया सुळे यांनी विरोधकांना केला आहे. आम्ही आमच्या पैशांनी खातो. आपण कुणाला मिंधे नाहीत, असेही त्यांनी म्हटले. तसेच, त्यांनी महायुती सरकारवरही अनेक मुद्द्यांवरून टीका केली. त्या दिंडोरी येथे महात्मा फुलेंच्या पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रमात बोलत होत्या.

दिंडोरी तालुक्यातील खेडगाव येथे महात्मा फुलेंच्या पुतळ्याचे अनावरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला मंत्री नरहरी झिरवळ आणि सुप्रिया सुळे यांनी उपस्थिती लावली होती. कार्यक्रमात भाषण दरम्यान मंत्री नरहरी झिरवळ यांच्यां समोरच सुप्रिया सुळे यांची सरकारवर सडकून टीका केली.

नेमके काय म्हणाल्या सुप्रिया सुळे? मी रामकृष्ण हरी वाली आहे. फक्त माळ घालत नाही. कारण कधी कधी मटण खाते, खरे बोलते. मी काही त्यांच्यासारखे खोटे बोलत नाही. माझ्या पांडुरंगाला चालते, तर तुम्हाला काय प्रॉब्लेम आहे? असा सवाल सुप्रिया सुळे यांनी विरोधकांना केला. आमचे आई-वडील खातात, सासू-सासरे खातात, नवरा खातो, असेही त्या म्हणाल्या. आम्ही आमच्या पैशांनी खातो. दुसऱ्यांचे आपल्याकडे उधार नाही. आपण कुणाला मिंधे नाहीत.

एकदा कुठेतरी जेवायला गेले असता, तिथे मटण खाल्ले होते. तेवढेच व्हायरल केले. खाल्ले तर काही पाप केले का? खायचा मोह होतो म्हणून अजून माळ घातली नाही. जे करायचे डंके की चोट पे, दिल खोल के करो, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.



मुख्यमंत्री आम्हाला वेळ देत नाहीत सुप्रिया सुळे यांनी यावेळी सरकारच्या कारभारावर टीका केली. मुख्यमंत्री तर मला वेळच देत नाही, असा आरोप सुळे यांनी केला. मुख्यमंत्री वेळ देत नसल्याने मी मागणेच बंद केले आहे. दहा वेळा आपण वेळ मागतो, पण वेळ देत नाहीत. याचा अर्थ काय, त्यांना वेळ द्यायचा नाही. म्हणून आम्ही थेट दिल्लीत जाऊन अमित शाह यांची भेट घेतो. मी ठरवले आहे, इथे काम करत नाही ना, माझी कामे दिल्लीत होतात असे सांगत त्यांनी अमित शहा यांचे जाहीर आभारही मानले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरसकट कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, मात्र ते पूर्ण केले नाही, असेही त्यांनी म्हटले. लाडकी बहीण योजनेत मोठा घोटाळा सुप्रिया सुळे यांनी सरकारच्या 'लाडकी बहीण' योजनेत मोठा घोटाळा झाल्याचा आरोप केला. या योजनेतून २५ लाख महिलांची नावे कमी करण्यात आली आहेत. माझी सगळ्यांना विनंती आहे, झिरवाळ साहेब आपण ताकदीने याचा विरोध करायला हवा. ४ हजार ८०० कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे. हजारो पुरुषांनी एवढे फॉर्म भरले कसे?'' असा सवालही सुळे यांनी केला. लाडक्या बहीण योजनेची संपूर्ण चौकशी करणार असल्याचेही सुप्रिया सुळे यांनी म्हटले.

माणिकराव कोकाटेंवरही साधला निशाणा सुप्रिया सुळे यांनी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर देखील टीका केली. पत्ते तुम्ही खेळायचे आणि कोर्टात चकरा आम्ही मारायच्या का? तुमची आब्रु तुमच्याच मागच्या माणसाने घालवली. व्हिडीओ कोणी काढला? असा सवालही सुप्रिया सुळे यांनी केला. रोहित पवार यांना सारख्या नोटीस येतात. पण आमचा रोहित घाबरत नाही, असेही त्या म्हणाल्या.

## देशाची टीम पाकिस्तानबरोबर क्रिकेट खेळणार? जय शहा, तुमचा कोण लागून गेला? - उद्धव ठाकरेंचा सवाल



मुंबई : शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भारतीय जनता पक्षावर (भाजप) जोरदार हल्लाबोल केला आहे. राज्य शिक्षक सेनेच्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी निवडणूक प्रक्रियेतील गैरप्रकार, पाकिस्तानबरोबर क्रिकेट सामन्यांचा प्रस्ताव आणि देशातील सैनिकांचे श्रेय लाटण्याचा भाजपचा प्रयत्न यावर सडेतोड टीका केली. प्रामाणिक निवडणूक झाली तर भाजप महाराष्ट्र जिंकू शकत नाही, असे उद्धव ठाकरे यांनी भाजपवर मत चोरीचा आरोप करत म्हटले आहे. प्रामाणिक निवडणूक घेतली तर भाजपला महाराष्ट्रात विजय मिळणार नाही. हे सगळं बोगस आहे. राहुल गांधी यांनी या ढोंगीपणाचे पितळ उघडे पाडले आहे, असे ते म्हणाले. पाकिस्तानबरोबर क्रिकेट खेळणार का? पाकिस्तानबरोबर क्रिकेट सामने खेळण्यावर ठाकरे यांनी संताप व्यक्त केला. कबुतर, कुत्रे, हत्ती यांच्यासाठी लोक रस्त्यावर उतरतात, पण माणुसकी कुठे जाते? गरम सिंदूर वाहत असल्याचे बोलता आणि आता देशाची टीम पाकिस्तानबरोबर क्रिकेट खेळणार? जय शहा, तुमचा कोण लागून गेला? क्रिकेट आणि रक्त एकत्र वाहणार का? अशी खरमरीत विचारणा त्यांनी केली.

## मंत्री उदय सामंत तडकाफडकी शरद पवारांच्या भेटीला, नेमकं कारण काय?

मुंबई : शिवसेना नेते आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी २३ ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्या मुंबईतील 'सिल्व्हर ओक' निवासस्थानी भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. मात्र, सामंत यांनी या भेटीचे कारण स्पष्ट करत राजकीय चर्चांना पूर्णविराम दिला. त्यांनी सांगितले की, ही भेट अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कामकाजासंदर्भात होती आणि यात कोणतेही राजकीय संदर्भ नाहीत.

भेटीचे कारण काय? उदय सामंत यांनी पत्रकारांना सांगितले की, शरद पवार हे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे मुख्य विश्वस्त आहेत, तर सामंत स्वतः या संस्थेचे कोषाध्यक्ष आणि विश्वस्त आहेत. या भेटीत नाट्य परिषदेच्या जिल्हा शाखांच्या उत्थानासाठी आणि संस्थेच्या भविष्यातील धोरणात्मक निर्णयांवर चर्चा झाली.

सामंत म्हणाले, शरद पवार यांनी ११ सप्टेंबर २०२५ रोजी माटुंगा येथील यशवंत नाट्यमंदिरात विश्वस्तांची विशेष बैठक बोलावली आहे. या बैठकीत नाट्य परिषदेच्या विकासासाठी महत्त्वाचे धोरण ठरवले जाणार आहेत. मी या कमिटीचा भाग असल्याने आजच्या बैठकीसाठी उपस्थित होतो.



उदय सामंत आणि शरद पवार यांच्या भेटीमुळे राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले होते, विशेषतः गणेशोत्सव आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर. काहींनी ही भेट शिवसेना आणि राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) यांच्यातील संभाव्य जवळीक किंवा चर्चेचा भाग असल्याचा अंदाज वर्तवला होता. मात्र, सामंत यांनी स्पष्ट केले की, या भेटीत राजकारणाचा लवलेशही नव्हता. ही पूर्णपणे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कामकाजासाठी आयोजित बैठक होती.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद ही मराठी नाट्य क्षेत्रातील एक महत्त्वाची संस्था आहे, जी १९०४ मध्ये स्थापन झाली. ही संस्था मराठी रंगभूमीच्या संवर्धनासाठी आणि नवीन कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी कार्यरत आहे. शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली ही संस्था मराठी नाट्य परंपरेचा वारसा जपण्यासाठी आणि नव्या पिढीला रंगभूमीशी जोडण्यासाठी विविध उपक्रम राबवते. उदय सामंत यांनी या संस्थेत कोषाध्यक्ष म्हणून महत्त्वाची जबाबदारी स्वीकारली असून, ते रत्नागिरी आणि कोकणातील नाट्य शाखांच्या विकासासाठी प्रयत्नशील आहेत.

## राळेगणसिद्धीमध्ये अण्णा हजारे भाजपच्या नजरकैदेत?:अण्णांचे माजी सहकारी शिवराम पाटील यांचा धक्कादायक संशय

समाजातील अन्यायाविरोधात आणि भ्रष्टाचारविरोधी चळवळीमुळे देशभरात लोकनायक म्हणून ओळखले जाणारे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे हे सध्या भयग्रस्त आहेत किंवा भाजपच्या नजरकैदेत आहेत, असा धक्कादायक संशय जळगाव जनजागृती मंचचे अध्यक्ष आणि अण्णांचे एकेकाळचे निकटचे सहकारी शिवराम पाटील यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

राळेगणसिद्धी येथे अण्णा हजारे यांची भेट घेताना शिवराम पाटील यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मतदार यादीतील घोळाविरोधात छेडलेल्या आंदोलनाला पाठिंबा द्यावा, अशी विनंती केली होती. मात्र अण्णांनी त्यांचे ऐकून घेतले तरी कोणताही



प्रतिसाद न दिल्याने पाटील यांनी संशय व्यक्त करत अण्णांच्या मौनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. अण्णांचा शांतपणा हा नैसर्गिक नसून दबावाखाली- पाटील

शिवराम पाटील यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, अण्णांचा सध्याचा शांतपणा हा नैसर्गिक नसून दबावाखालील आहे. त्यांनी नेहमी अन्यायाविरुद्ध आवाज उठवला, मग आज ते का गप्प आहेत? त्यांच्या या प्रश्नानंतर आता अण्णा हजारे यांच्या आरोग्याविषयी तसेच त्यांच्यावर राजकीय दबाव तर नाही ना, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. शिवराम पाटील यांनी नुकतीच अण्णांची भेट घेतली होती, त्या भेटीदरम्यानचा व्हिडिओ...

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने १२९ व्या कार्यशाळेचे आयोजन. चला, क्रिमिलेअर समजून घेऊया.

छत्रपती संभाजी नगर / प्रतिनिधी : आपण सर्वांना याद्वारे कळविण्यात येत आहे की, २४ ऑगस्ट २०२५, रविवार ला क्रिमीलेअर समजून घेण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. १२९वीवैचारिकप्रबोधनात्मकसाप्ताहिककार्यशाळा: दिनांक : २४ ऑगस्ट २०२५, रविवार. वेळ : दुपारी २:३० वाजता, स्थळ : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल चे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर (पेठे नगर), भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. येथे क्रिमीलेअरचे समाज जीवनावर होणारे दुरगामी परिणाम आणि आपली भूमिका. या विषयावर १२९ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेला सामाजिक कार्यकर्ते ॲड. अविनाश थिटे हे उद्घाटनर मार्गदर्शन करणार आहेत. तर सामाजिक कार्यकर्ते दिनकर ओंकार हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या कार्यशाळेत नोंदणीकृत सर्व प्रतिनिधींना आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे. जेणेकरून त्यांना आपले म्हणणे इतरांना समजावून सांगता येईल व इतरांचे म्हणणे समजून घेता येईल. करिता ९४२१६७८६२८, ९९६०३४६०५४, ८८०६३८४११५, ८९८३०८२१२८ या क्रमांकावर नोंदणी करावी. तरी आपले मत पटवून देण्यासाठी व इतरांची मते समजून घेण्यासाठी आपण मित्र परिवारासह उपस्थित राहावे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## चेअरमन श्रीमती वैशालीताई देशमुख यांच्या हस्ते पोळ्यानिमित्त पूजन

बाभळगाव / प्रतिनिधी : - भारतीय कृषी संस्कृतीचा आत्मा असलेल्या पोळा सणाचा उत्साह शुक्रवारी सर्वत्र दिसून आला. या विशेष दिवशी, वाभळगाव येथे विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते बैलांचे पूजन करण्यात आले. शेतकरी सोबत त्याच्या खांद्याला खांदा लावून कष्ट करणाऱ्या बैलांच्या अनोख्या नात्याचा हा उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा झाला. या प्रसंगी पोळा सणाबद्दल त्यांनी सर्व शेतकरी बांधवांना शुभेच्छा दिल्या. पोळा हा सण केवळ बैलांची पूजा करण्याचा दिवस नसून वर्षभर शेतीत घाम गाळणाऱ्या त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा क्षण आहे. ग्रामीण जीवनातील हा उत्सव आपल्याला मातीशी आणि निसर्गाशी असलेल्या आपल्या अतूट नात्याची आठवण करून देतो. या सोहळ्यानिमित्त श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी बैलांची मनोभावे पूजा केली. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, भारतीय शेतीमध्ये बैलांचे महत्त्व अनमोल आहे. यांत्रिकीकरण वाढत असले तरी शेतीचा खरा आधार बैलच आहेत. त्यांच्या श्रमामुळेच शेतकरी त्याच्या शेतात सोन्यासारखे पीक पिकवू शकतो.




या प्रसंगी उपसरपंच गोविंद देशमुख, अविनाश देशमुख, महादेव जटाळ, महादेव देशमुख, भीमा शिंदे, सचिन मस्के, मुक्ताराम पिटले,गोपाळ थडकर आदी उपस्थित होते.

## गणेशोत्सव निमित्त मालमत्ताधारकांना मनपाची भेट, मालमत्ता कर १०० % शास्ती माफी योजना

### दि. २४ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर पर्यंत १००% शास्ती माफी योजना लागू

लातूर /प्रतिनिधी : कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या सुरूवातीपासूनच १००% मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट ठेवून मालमत्ताधारकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार चालू वर्षातील मालमत्ताधारकांसाठी सूट व थकबाकीधारकांसाठी शास्ती माफी योजना वेळोवेळी लागू करण्यात आली होती. त्या अंतर्गत विविध प्रकारचे सुट व १००% शास्ती माफी योजना ही लागू करण्यात आली होती. सदरील सुटचा लाभ घेऊन आतापर्यंत २० हजार हून अधिक मालमत्ताधारकांनी आपला टॅक्स भरणा केला आहे, परंतु वारंवार प्रशासनामार्फत आवाहन करूनही व सूट लागू करूनही काही मालमत्ताधारक प्रतिसाद देत नसल्याने पुढील महिन्यापासून जप्तीची धडक मोहीम राबविण्यात येणार आहे. परंतु तत्पूर्वी थकबाकीदार मालमत्ताधारकांना शेवटची संधी देण्याच्या दृष्टीने पुन्हा एकदा १००% शास्ती माफी ची योजना लागू करुन थकबाकीधारकांना टॅक्स भरणा करण्याची संधी




देण्याच्या निर्णय आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी घेतला आहे . तेव्हा सर्व मालमत्ताधारकांना कळविण्यात येते की, गणेशोत्सव निमित्त लागू केलेल्या ऑफर अंतर्गत दिं.२४ ऑगस्ट ते ०८ सप्टेंबर या कालावधीत आपल्याकडील थकीत कर एक रक्कमी भरल्यास आकारण्यात आलेल्या व्याज/शास्ती मध्ये १०० टक्के सूट देण्यात आली आहे. तसेच १००% शास्ती सुट योजना या वर्षात तिसऱ्यांदा लागू करण्यात आली असून ही शेवटची संधी असून यानंतर पुन्हा ही योजना लागू होणार नसल्याचे निर्णय घेण्यात आला आहे तरी अधिकाधिक थकबाकीदारानी सुवर्णसंधीचा लाभ घेऊन टॅक्स भरणा करावा. तरी या योजनेचा सर्व थकबाकीधारक मालमत्ताधारकांनी लाभ घेवुन आपल्याकडील देय कराचा भरणा करून महानगरपालिकेस सहकार्य करावे व पुढील महिन्यापासून सुरू होणारे जप्ती सारखी कटू कार्यवाही टाळावी असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी केले आहे.

# संपादकीय

## गरज संविधानिक मूल्ये जपण्याची!

स्वातंत्र्यदिनासारख्या सोहळ्यांतील प्रमुख विरोधी पक्षांच्या नेत्यांची अनुपस्थिती ही संविधानिक मूल्ये आणि लोकशाही परंपरांची अवमाननाही आहे. देशाच्या राष्ट्रीय सोहळ्यांमध्ये विरोधकांचा सहभाग हा केवळ औपचारिक अनुष्ठान नसतो, तर तो लोकशाहीतील सहमतीचा आणि भावनिक ऐक्याचा प्रतीक असतो. विरोधी पक्षाची अनुपस्थिती ही संविधानाच्या आत्म्याला धक्का देणारी ठरते. यातून समाजात असा चुकीचा संदेश जातो की, नेत्यांचे व्यक्तिगत मतभेद हे राष्ट्रहितापेक्षा वरचे आहेत.

विनायक सरदेसाई, ज्येष्ठ विश्लेषक भारतीय लोकशाहीचे सौंदर्य त्याच्या विविधतेत, मतभेदांत आणि वेगवेगळ्या वैचारिक प्रवाहांमध्येही टिकून राहिलेल्या राष्ट्रीय एकतेत आहे. दरवर्षी १५ ऑगस्टला देशात लाल किल्ल्यावर स्वातंत्र्यदिनाचा मुख्य सोहळा पार पडतो. हा फक्त एक शासकीय विधी नसतो, तर संपूर्ण भारताच्या एकात्मतेचे सार्वजनिक प्रदर्शन असते. हे असे क्षण असतात जेव्हा राजकीय मतभेद, सत्ताधारी- विरोधकांतील दरी आणि व्यक्तिगत राग-द्वेष मागे पडायला हवेत आणि पुढे राहायला हवी ती फक्त राष्ट्रभावना. हा प्रसंग आंतरराष्ट्रीय पातळीवरही भारताची राष्ट्रीय एकता प्रदर्शित करण्याची संधी असतो. यावर्षी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे आणि काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्या सोनिया गांधी यांची अनुपस्थिती या बाबतीत एक महत्त्वाचा प्रश्न उभा करते. अशा राष्ट्रीय सोहळ्यांमध्ये विरोधी पक्षाची गैरहजेरी ही भारतीय प्रजासत्ताक टिकवून ठेवणार्या लोकशाहीच्या गरिमेला धक्का देणारी नाही का?

संविधानिक पदाला त्याची स्वतःची एक प्रतिष्ठा आणि मर्यादा असते. विरोधी पक्षनेतेपद हा कोणताही औपचारिक किंवा सांकेतिक दर्जा नसून तो संविधानिक दर्जा आहे. स्वतंत्र भारताच्या संविधानानुसार हे पद सरकार आणि जनतेमधली एक महत्त्वाची कडी आहे. १९७७ मध्ये पहिल्यांदा भारतात अधिकृतपणे विरोधी पक्षनेत्याचा दर्जा निश्चित केला. त्यावेळी अशी अपेक्षा होती की, लोकशाहीत विरोधकांची भूमिका ही सत्ताधारी सरकारइतकीच महत्त्वाची आहे. घटनातज्ज्ञांच्या मते पंतप्रधान जिथे शासन आणि धोरणांचे प्रतिनिधी असतात, तिथे विरोधी पक्षनेते हे संतुलन, टीका आणि पर्यायी दृष्टिकोन यांचे प्रतिनिधी असतात. त्यामुळे कोणत्याही राष्ट्रीय सोहळ्यात विशेषतः स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन किंवा राष्ट्रीय शोकप्रसंगी त्यांची उपस्थिती ही केवळ परंपरा किंवा शिष्टाचार नसून घटनात्मक कर्तव्यही आहे.

'देशाचा विरोधी पक्षनेता' हा कोणत्याही एका पक्षाचा नसून संपूर्ण भारताचा असतो. लोकशाहीत विरोधी पक्षनेते याचा अर्थ केवळ 'विरोधकांचा नेता' एवढाच नसतो. तो लोकशाहीच्या रचनेतील त्या सबळ आवाजाचे प्रतीक असतो, जो सत्ताधार्यांच्या धोरणांना संतुलित करतो, जबाबदारी ठरवतो आणि सामान्य जनतेच्या अपेक्षांचे प्रतिनिधित्व करतो. जेव्हा विरोधी पक्षनेते स्वातंत्र्यदिनासारख्या सोहळ्याला अनुपस्थित राहतात, तेव्हा ते संपूर्ण राष्ट्राच्या एका वर्गाचे प्रतिनिधित्व करण्यास नकार देणे ठरते. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, १९७७ च्या लोकसभा निवडणुकांनंतर पहिल्यांदा अस्तित्वात आलेल्या जनता पार्टी सरकारच्या काळात काँग्रेस विरोधात गेली होती, तरीही काँग्रेसचे नेते स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्याला हजर राहिले. ती परंपरा पुढेही कायम राहिली. एवढेच नव्हे, तर १९७५ च्या आणीबाणीच्या तातडीच्या काळातही जेव्हा राजकीय तणाव शिगेला पोहोचला होता, तेव्हाही राष्ट्रपती, पंतप्रधान आणि विरोधी पक्षनेते हे सार्वजनिक सोहळ्यांमध्ये एकत्र दिसत असत.

ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहता स्वातंत्र्यदिन किंवा प्रजासत्ताक दिन हे फक्त शासकीय आढावा किंवा सोहळे नसून भारताच्या सार्वभौमत्वाचे, विविधतेचे आणि लोकशाही समावेशकतेचे प्रदर्शन आहेत. या सोहळ्यांच्या मंचावरून भारत संपूर्ण जगाला हा संदेश देतो की, येथे विचारांची विविधता असूनही राष्ट्राची संकल्पना सर्वो परी आहे. भाजप जेव्हा विरोधी बाकावर होता, तेव्हा त्यांचे वरिष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी आणि अटल बिहारी वाजपेयी संसदेत व राष्ट्रीय सोहळ्यांमध्ये केवळ उपस्थितच राहत नव्हते, तर शिस्तबद्धतेसाठी आणि लोकशाही मूल्यांसाठी प्रसिद्ध होते. काँग्रेस नेतृत्वाची वारंवार अनुपस्थिती ही लोकशाही परंपरांना बाधा आणणारी ठरत आहे. गेल्या अनेक वर्षांत असे दिसून आले आहे की, काँग्रेसचे शीर्ष नेते विशेषतः राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे आणि सोनिया गांधी राष्ट्रीय सोहळ्यांपासून कधी दूर राहिले आहेत, तर कधी किरकोळ कारणांचा दाखला दिला आहे. अलीकडच्या वर्षांत प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्यदिनासारख्या प्रसंगी काँग्रेस नेते कधी आलेच नाहीत किंवा बसण्याच्या जागेबाबत असहमती दर्शवली. राहुल गांधींच्या विधानांमध्ये आणि वर्तनामध्ये भारतीय लोकशाही मूल्यांच्या कसोटीवर टिकून न राहण्याचे अनेक दाखले दिसतात. त्यांच्या वागणुकीत आणि विधानांत अपरिपक्वतेची झलक अनेकदा जाणवते. संसदेत व राष्ट्रीय सोहळ्यांत अनुपस्थित राहणे, प्रसंगी न येता केवळ सोशल मीडियावर देशभक्ती व्यक्त करणे किंवा न येण्याचे कारण सार्वजनिकपणे मांडणे? हे सर्व लोकशाही जबाबदारीविषयीच्या अपेक्षित गांभीर्याच्या विरुद्ध आहे. अनेकदा ते राष्ट्रीय निवडणुका किंवा संविधानिक संस्थांवर गंभीर आरोपही बिनबुडाचे करतात. यामुळे सार्वजनिक जीवनात त्यांच्या गंभीरतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते.

देशाच्या अशा राष्ट्रीय सोहळ्यांमध्ये विरोधकांचा सहभाग हा केवळ औपचारिक अनुष्ठान नसतो, तर तो लोकशाहीतील सहमतीचा आणि भावनिक ऐक्याचा प्रतीक असतो. विरोधी पक्षाची अनुपस्थिती ही संविधानाच्या आत्म्याला धक्का देणारी ठरते. यातून समाजात असा चुकीचा संदेश जातो की, नेत्यांचे व्यक्तिगत मतभेद हे राष्ट्रहितापेक्षा वरचे आहेत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरही भारताच्या लोकशाही प्रतिमेबाबत शंका निर्माण होतात. म्हणूनच लोकशाहीचा भक्कमपणा, परिपक्वता आणि सामाजिक ऐक्य टिकवण्यासाठी विरोधी पक्षाचा जबाबदार सहभाग आवश्यक आहे. राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे आणि सोनिया गांधी यांची स्वातंत्र्यदिनासारख्या सोहळ्यांमधली अनुपस्थिती ही केवळ दुर्दैवीच नाही, तर ती संविधानिक मूल्ये आणि लोकशाही परंपरांची अवमाननाही आहे. भाजप विरोधात असलेल्या काळातील भूमिका ही त्याची उत्तम उदाहरणे आहेत, ज्यांनी वेगळे मत असूनही राष्ट्राच्या एकतेच्या आणि लोकशाही शिष्टाचाराच्या हितासाठी अशा सोहळ्यांत उपस्थिती दाखवली. वरिष्ठ विरोधी नेत्यांनी हे विसरता कामा नये की, त्यांचे कर्तव्य फक्त पक्षीय राजकारणापुरते मर्यादित नाही, तर ते भारतीय लोकशाहीचे पूरक आणि 'भारत प्रथम' या भावनेचे संवाहक आहेत.

# २४ ऑगस्ट शहिद राजगुरू महान क्रांतिकारक यांची जयंती

महाराष्ट्रातील पुणे येथील खेड गावांमध्ये (आताचे राजगुरू नगर) पुणे २४ ऑगस्ट १९०८ ला शिवराम हरी राजगुरू नावाचा महान क्रांतिकारक जन्माला आला.जनुकाय या पृथ्वीवर लखलखत्या सुर्यप्रकाशाचा जन्म झाला की काय असे सर्वांना भासु लागले. कारण जन्मतःच त्यांच्या चेहऱ्यावर क्रांतीची ज्वाला धगधगत होती आणि भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात एक तेजोमय लखलखता प्रकाश प्रगट झाला व क्रांतीची मशाल संपूर्ण भारतात सुर्या प्रमाणे प्रज्वलीत झाली.राजगुरूनी संस्कृत भाषेत शिक्षण घेतले.लघुसिध्दांत कौमुदीचा अभ्यास केला. त्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी आणि कन्नड भाषा चांगलीच अवगत होती.क्रांतीकारी विचारसरणीचे चंद्रशेखर आझाद आणि लोकमान्य टिळक यांच्या विचारांच्या प्रभावामुळे अल्पवयातच राजगुरू इंग्रजाची घृणा करू लागले व स्वतंत्र लढ्यात उडी घेतली. राजगुरू हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशनचे सदस्य होते.यानंतर चंद्रशेखर आझाद, भगतसिंग,सुखदेव थापर घनीष्ठ मित्रं झाले आणि क्रांतीला नवी दिशा व चालना देवून क्रांतीची ज्वाला प्रज्वलित केली.आज शहिदांच्या पुंण्यायीनेच देशाची १४० कोटी जनता मोकळा स्वास घेत आहे.अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष यांच्या अथक परिश्रमाने,प्रयत्नाने व बलीदानाने १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.क्रांतिकारकांनी कोणत्याही गोष्टीची व आपल्या परिवाराची पर्वा न करता इंग्रजांना सडेतोड उत्तर देऊन स्वतंत्र भारताची मशाल १९४७ ला प्रज्वलीत केली. १९२८ ला भारतातील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले. त्यावेळी सायमन कमिशन नावाचे वादळ रोखण्यासाठी लाला लजपतराय यांनी पुढाकार घेऊन सायमन परत जाच्या घोषणांनी संपूर्ण भारत एकवटला.हि बाब सायमन कमिशनचे अधिकारी सँडर्स यांना पचली नाही.लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने प्रदर्शनकारी जमा झाले.यामुळे सायमन कमिशनची घाबरगुंडी उडाली व जमाव पांगवण्यासाठी सँडर्स यांनी लाठीचार्जचा आदेश दिला.यात लाला लजपतराय घायाळ झाले आणि त्यातच १७ डिसेंबर १९२८ ला त्यांची प्राणज्योत मालवली.त्यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण भारत शोकाकुल झाला.हे दु:ख राजगुरू, भगतसिंह आणि सुखदेव यांना पहावले नाही.त्यामुळे क्रांतीकारकांच्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी क्रांतिकारकांनी कंबर कसली व लाला लजपतराय यांच्या मृत्यूला कारणीभूत असणारा अधिकारी सँडर्स याला ठार मारण्याची योजना आखली.लाला लजपतराय यांच्या पहिल्या मासिक श्राध्दाच्या दिवशी राजगुरू,भगतसिंग,आणि सुखदेव हे तिघेही वेष बदलुन जॉन सँडर्स यांच्या निवासस्थानी गेले.सँडर्स दिसताच सुखदेव यांनी संकेत दिले.संकेत मिळताच भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाचवेळी गोळ्या झाडून सँडर्सला जागीच ठार केले व तेथुन पलायन केले.यामुळे इंग्रज आगबबुला झाले व इंग्रजांनी तिघांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.बरेच दिवस इंग्रजांना हुलकावणी देत तिन्ही क्रांतिकारक भूमिगत राहिले. परंतु फितुरीमुळे ते पकडले गेले.शेवटी २३ मार्च १९३१ ला भारतमातेच्या तिन्ही सुपुत्रांना इंग्रजांनी फाशी दिली.यामुळे संपूर्ण भारत स्तब्ध होऊन सर्वत्र शोककळा पसरली.भारत स्वतंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या या तिन्ही सुपुत्रांना कोन्हीही विसरणार नाही.जो पर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत या शहिदांना कोन्हिही विसरणार नाही. राजगुरू,भगतसिंग आणि सुखदेव यांचे बलीदान पाहून १४० कोटी जनतेच्या तळपायाची आग आजही मस्तकात जाते.परंतु ९५ टक्के राजकीय पुढारी शहिदांना विसरल्याचे दिसून येते.कारण ९५ टक्के राजकीय पुढारी आज देशाच्या विकासापेक्षा स्वत:च्या विकासाकडे जास्त लक्ष देताना दिसतात.इंग्रजांनी भारताला लुटले ही बाब सत्य आहे. परंतु देशातील भ्रष्ट राजकीय पुढाऱ्यांनी देशाला हजारोपटीने लुटले आहे त्यामुळे देशात अनेक गंभीर समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.यामुळे आज देशात मुलभूत सुविधांचा अभाव, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, कुपोषण, महागडे शिक्षण इत्यादींचा सामना आज देशातील १४० कोटी जनतेला करावा लागतो. राजकीय पुढाऱ्यांनो याद राखा जोपर्यंत तुम्ही देशविकासासाठी, जनतेच्या हितासाठी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी संपूर्ण ताकद लावणार नाही तोपर्यंत शहिदांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही. क्रांतिकारक,शहिद अल्पवयात हसत-हसत फासावर का चढले यामागचा त्यांचा एकच उद्देश होता.तो म्हणजे मातृभुमिची रक्षाकरून सर्वसामान्यांना न्याय मिळावा व भारत स्वतंत्र होवून सुख शांती निर्माण व्हावी व सुजलाम सुफलाम व्हावा.परंतु आजचा राजकीय पुढारी असा झाला आहे की लोका सांगे ग्यान व स्वत: कोरडे पाषाण यामुळेच या कृषी प्रधान देशात मुठभर राजकीय पुढारी वाममार्गाने पैसा कमवुन करोडपती व अरबोपती झाल्याचे दिसून येते.भारतात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व गरीब हा गरीबीच्या खाईत जात आहे.या संपूर्ण बाबींची जान राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे व देशसेवा आणि जनसेवा याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांची शहीदांना खरी श्रद्धांजली मानल्या जाईल.राजकीय पुढाऱ्यांना फक्त शहिदांचे अनुकरण करून लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी या पदाला कलंकित न करता यांचा योग्य उपयोग करून जनसेवा केली पाहिजे. तेंव्हाच शहिद राजगुरू यांना खरी श्रद्धांजली ठरेल व शहिदांच्या आत्म्याला शांती मिळेल.संपुर्ण देश शहिदांना आपली आदरांजली अर्पण करीत आहे.परंतु शहिदांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची जाण मुख्यत्वेकरुन राजकीय पुढाऱ्यांनी ठेवण्याची गरज आहे.कारण राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष देशसेवेपेक्षा फक्त स्वतःचे हीत साधण्याचा प्रयत्न जास्त असतो.त्यामुळे सावधान राजकीय पुढाऱ्यांनो कोणतेही कार्य करतांना शहिदांचे अनुकरण अवश्य करावे व त्यांच्या बलीदानाला कोठेही ठेच किंवा तडा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी.हे भारत मातेच्या शहिद भुमि पुत्रांनो माझा कोटी कोटी प्रणाम,शहिद राजगुरू यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रत्येकांनी वृक्षलागवड केली पाहिजे.मुख्यत्वेकरून राजकीय पुढारी,सरकार,प्रशासन, स्थानिक प्रशासन व सामाजिक संस्था यांनी राजगुरू यांच्या जयंतीनिमित्त आठवण म्हणून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे.यामुळे संपूर्ण सृष्टी प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल व झाडांच्या पानांत, फुलात, फळात आपल्याला शहिद राजगुरू सह संपुर्ण शहिदांचे अवश्य दर्शन होईल.जब तक सुरज चांद रहेंगा तबतक शहिदोंका नाम रहेंगा शहिद राजगुरू यांना कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!

**********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# सौरऊर्जा क्रांतीच्या नव्या दिशा

कृषी क्षेत्रामध्ये केवळ सिंचनासाठी देशातील एकूण विजेपैकी सुमारे २० टक्के वीज वापरली जाते. याशिवाय, डिझेलचा मोठा हिस्सा हाही याच कामात खर्च होतो. हे लक्षात घेऊन डिझेल पंपांच्या जागी सौरऊर्जेवर चालणारे पंप बसवून आणि ग्रिडशी जोडलेल्या पंपांना सौरऊर्जेशी संलग्न करणारी 'पीएम-कुसुम योजना' क्रांतिकारी ठरणार आहे. कार्बन उत्सर्जन कमी करण्यात, सबसिडीचा भार कमी करण्यात आणि शेतकर्यांना इनपुट खर्चातील चढ-उतारांपासून वाचवण्यात ही योजना महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सौर योजनेचा पहिला टप्पा २०२५-२६ मध्ये सुरू असून, त्याचा उद्देश सौर पंपांची स्थापना, ग्रिडशी जोडलेल्या पंपांचे सौर पंपांमध्ये रूपांतर, तसेच पडीत जमिनीवर छोट्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या साहाय्याने ३४.८ गिगावॅट अतिरिक्त सौरऊर्जा उपलब्ध करणे हा आहे. सुमारे ३४,००० कोटी रुपये एवढ्या तरतुदीसह या योजनेचे ध्येय आहे. १४ लाख सौर पंप बसवणे आणि ग्रिडशी जोडलेल्या ३५ लाख कृषी पंपांचे सौरपंपात रूपांतर करणे. यात फीडर स्तरावर संपूर्ण सौर ऊर्जाकरणाचाही समावेश आहे. प्रत्यक्षात या योजनेसाठी मागणीत वाढ झालेली दिसते आणि यावरून सौरऊर्जा स्वीकारण्याची व विस्तारण्याची तीव- गरज अधोरेखित होते. केवळ२०२४-२५ या वर्षातच भारतीय नवीकरणीय ऊर्जा विकास संस्थेकडे कुसुम योजनेअंतर्गत कर्जमंजुरीत २७ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली असून, एकूण मंजूर कर्ज रक्कम ४७,४५३ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. प्रत्यक्ष कर्जवितरणातही २० टक्क्यांची भर पडली आहे.

आता नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय दुसर्या टप्प्याची अंमलबजावणी सुरू करण्याची शक्यता वाढली आहे. पहिल्या टप्प्यातील अनुभवांचा आधार घेत आता केंद्रीय आर्थिक सहाय्याची मर्यादा हटवली जाऊ शकते. त्याचबरोबर 'ॲग्रोवोल्टेइक' प्रकल्प (ज्यात पीक आणि सौर पॅनल एकत्र नांदतात) यांना समायोजित करण्याची तयारीही आहे. महाराष्ट्राच्या केंद्रीकृत भू-अभिलेख पोर्टलच्या धर्तीवर मोठ्या प्रमाणावर मॉडेल स्वीकारले जाऊ शकते. येथे ४०,००० एकरांहून अधिक जमीन सौर शेतीसाठी वापरली जात आहे. या योजनेच्या माध्यमातून डिझेल पंपांच्या जागी सौर पंप आल्यानंतर कार्बन उत्सर्जन कमी होईल आणि इंधन दरातील चढ-उतारांचा फटका शेतकर्यांना बसणार नाही. सौर ऊर्जा दिवसा कमाल उत्पादन करत असून, ती सिंचनाच्या गरजेशी सुसंगत आहे आणि यामुळे खर्चही कमी येतो. एवढेच नव्हे, तर शेतकर्यांनी निर्माण केलेली जादा वीज पुन्हा ग्रिडला विकता येते. यामुळे त्यांना अल्प खर्चात अतिरिक्त उत्पन्न मिळते. याप्रकारे सौर ऊर्जा ही केवळ कार्बन उत्सर्जन घटविण्याचे साधन नाही, तर विकेंद्रित व मजबूत वीजपुरवठेची हमी देणारी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारी ठरते.



पवन ऊर्जा व बायोमास हे देखील देशाच्या नवीकरणीय ऊर्जेच्या मिशणात महत्त्वाचे घटक आहेत; पण पवन ऊर्जेच्या क्षमतांचा पुरेपूर उपयोग करण्यात भौगोलिक अडचणी येतात. बायोमासच्या बाबतीत लॉजिस्टिक व शाश्वततेचे प्रश्न उभे राहतात. याउलट सौरऊर्जा ही शेतकर्यांच्या नियंत्रणातील व तुलनेने स्वस्त ऊर्जा आहे. घरगुती पातळीवर सौरऊर्जेचा स्वीकार आधीच सकारात्मक परिणाम देत आहे. देशभरात छतावरील सौरऊर्जा प्रकल्पांची क्षमता १९ गिगावॅटच्या पुढे गेली आहे. जुलै २०२५ पर्यंत देशाची एकूण बसवलेली सौर क्षमता ११९ गिगावॅटपेक्षा जास्त झाली आहे. पीएम सूर्य घर मोफत वीज योजनेमुळे १० लाखांहून अधिक घरं सौर ग्रीडमध्ये सामील झाली आहेत. यावरून विकेंद्रित मॉडेल यशस्वी ठरू शकतात, हे स्पष्ट होते.

# स्वदेशी उद्योग आणि आत्मनिर्भरता

आपल्या देशात गणपतीची मूर्तीदेखील परदेशातून येते. होळीचे रंग आणि पिचकारीदेखील चीनमधून येते. त्यामुळे आपण स्वदेशीचा वापर वाढवावा, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवाहन केले आहे.

जेव्हा आपण स्वदेशी उत्पादने निवडतो, तेव्हा आपण कारागिरांना आणि हस्तकला उद्योगांना सक्षम बनवतो व उपजीविकेच्या संधी निर्माण करतो. त्याचप्रमाणे देशाची अर्थव्यवस्था मजबूत करतो, असे उद्गार नुकतेच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काढले आहेत. २४ जानेवारी २०१८ रोजी उत्तर प्रदेशात 'वन डिस्ट्रिक्ट वन प्रॉडक्ट' (ओडीओपी) हा कार्यक्रम ७५ जिल्ह्यांमध्ये राबवण्यास प्रारंभ करण्यात आला. लखनौमधील चिकनकारी, मुरादाबादमधील पितळेची भांडी, सहारनपूर येथील लाकडी हस्तकला, चित्रकूटची लाकडी खेळणी, फिरोदाबादच्या काचेच्या बांगड्या व दिवे, वाराणसीतील बनारसी सिल्क साड्या, बदायूँमधील जरीकाम अशा अनेक उद्योगांना तेथे प्रोत्साहन दिले जात आहे.

मथुरेचा पेढा, बलियाचा सत्तू, बिजनोरचा सेंद्रीय गूळ, आझमगडची काळ्या मातीची भांडी, गोरखपुरातील टेराकोटाची मातीच्या कलावस्तू अशा अनेक उद्योगांसाठी कौशल्यप्रशिक्षण, सामान्य सुविधा केंद्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. जागतिक व्यापार प्रदर्शने आणि ई-कॉमर्सचा फायदा घेत, उत्तर प्रदेशने ओडीओपीशी संबंधित निर्यात गतवर्षी १ लाख ८६ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवली. स्वदेश गिफ्ट हँपर योजनादेखील राबवण्यात आली असून, ते स्वदेशीच्या संकल्पनेशी सुसंगतच आहे.

दुसरीकडे, भारतातील पहिली देशांतर्गततरीत्या उत्पादित सेमीकंडक्टर चिप यंदा बाजारात आणली जाईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना जाहीर केले आहे. देशांतर्गत उत्पादनाद्वारे भारताचे वाढते परावलंबित्व कमी करणे, हा यामागील उद्देश आहे. जागतिक आर्थिक अनिश्चितता असल्याने जनतेने स्वदेशी भावना स्वीकारावी आणि स्थानिक पातळीवर तयार झालेल्या उत्पादनांना पाठिंबा द्यावा, असे आवाहन करण्यात येत असून, त्याचे देशवासीय स्वागतच करतील. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताची अर्थव्यवस्था मृतवत असल्याचा उल्लेख केला होता. खरे तर, भारत जगातील तिसरी अर्थव्यवस्था होण्याकडे वाटचाल करत आहे. अशावेळी भारतीय अर्थव्यवस्थेबाबत अनुदार उद्गार काढणे, हे संतापजनकच होते. अशावेळी देशाची खरी सेवा ही स्वदेशी वस्तूंना प्रोत्साहन देण्यात आहे. स्वदेशीचा उद्देश केवळ विदेशी कपड्यांच्या बहिष्कारापुरता मर्यादित नव्हता, तर आपल्या आर्थिक स्वातंत्र्याला मिळालेले ते एकप्रकारचे बळ होते. मुख्यत्वे भारताच्या लोकांना आपल्या विणकरांसोबत जोडण्याची ती एक मोहीम होती, याकडे त्यांनी लक्ष वेधले होते.

मागील दहा वर्षांत देशांतर्गत खादीच्या उत्पादनात तिपटीपेक्षा अधिक वाढ झाली असून, खादी कपड्यांच्या विक्रीत पाचपट वाढ झाली आहे. केंद्र सरकारने 'व्होकल फॉर लोकल'चा मंत्र दिला. आमच्याकडे गणपतीची मूर्तीदेखील परदेशातून येते आणि तीदेखील छोटी आँखवाली! होळीचे रंग आणि पिचकारीदेखील चीनसारख्या देशातून येते, याकडे लक्ष वेधत,



पंतप्रधानांनी विदेशी वस्तू वापरू नका. देशातील वस्तूच खरेदी करा, असे आवाहन याआधीही केले आहे. स्वदेशी उपक्रमाचाच एक भाग म्हणजे 'मेक इन इंडिया' ही योजना. २०१४ मध्ये संपूर्ण देशात मोबाइलची निर्मिती करणारे केवळ दोन कारखाने होते. आज हा आकडा दोनशेहून अधिक झाला आहे. भारताची मोबाइल निर्यात १ हजार ५५६ कोटींवरून १ लाख २० हजार कोटी रुपयांपर्यंत जाऊन पोहोचली आहे. आज भारतात वापरले जाणारे लाखो मोबाइल फोन 'मेक इन इंडिया'मधूनच तयार झालेले आहेत. जागतिक स्तरावर भारत दुसर्या क्रमांकाचा सर्वात मोठा मोबाइल उत्पादक बनला आहे. आता आपण पूर्णतः प्रक्रिया केलेल्या पोलादाचे निर्यातदार बनलो आहोत. २०१४ पासून पोलादाच्या उत्पादनात ५० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. गेल्यावर्षीच सेमीकंडक्टरची निर्मिती करणार्या तीन प्रकल्पांचा शुभारंभ झाला. त्यापैकी दोन प्रकल्प गुजरातमध्ये, तर एक आसाममध्ये आहे. यातले दोन प्रकल्प हे टाटा, तर तिसरा मुरुगन कंपनीचा आहे. सेमीकंडक्टर उत्पादनात भारत प्रवेश करत असून, त्यात १५०० कोटी डॉलर्सची गुंतवणूक केली जाणार आहे. हे प्रकल्प जेव्हा कार्यान्वित होतील, तेव्हा पाच लाख लोकांना रोजगार मिळणार आहे. आजचे युग हे कृत्रिम बुद्धिमत्तेचे त्याचप्रमाणे तंत्रज्ञानाचे आहे. मोबाइल, कॉम्प्युटर, लॅपटॉप, कृत्रिम बुद्धिमत्ता, बँकिंग, संरक्षण, वाहननिर्मिती, वैद्यकीय या सर्व क्षेत्रांमध्ये सेमीकंडक्टर, म्हणजेच मायक्रो चिपचा वापर केला जातो. गेल्यावर्षी आयफोन-६ आला, तेव्हा त्यातल्या छोट्या मायक्रोचिपमध्ये कॉम्प्युटरमधील बर्याच गोष्टी सामावलेल्या होत्या.

जपान, अमेरिका, चीन, तैवान यांनी या क्षेत्रात उतुंग झेप घेऊन आपले वर्चस्व वाढवले आहे. आज जगातील ७० ते ८० टक्के मायक्रो चिप्स तैवानमध्ये तयार होतात. अमेरिकेने डोनाल्ड ट्रम्प यांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या पहिल्या कारकिर्दीच्या वेळी चीनशी व्यापारयुद्ध छेडले होते. राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा पुढे करून, ५-जी स्मार्टफोन आणि चिप तंत्रज्ञान क्षेत्रातील 'हुआवे' या चिनी कंपनीवर निर्बंध घातले.एवढेच नव्हे, तर २०१९ पासून उच्च तंत्रज्ञान क्षेत्रातील चिनी कंपन्यांना आपला माल अमेरिकेस पाठवण्यावर नियंत्रणे आणली. झेडटीई, हुआवे या दूरसंचार क्षेत्रातील चिनी कंपन्यांवरही करवाई सुरू केली. दोन वर्षांपूर्वी अमेरिकेने एनव्हिडिया तसेच एएमडी या कंपन्यांना चीनमधल्या आस्थापनांना एआय मॉडेलिंगसाठी वापरल्या जाणार्या जीपीयू चिप विकायलाही त्यांनी बंदी घातली.

एवढेच नव्हे, तर अमेरिकेने आपल्या जवळच्या देशांनाही अशाप्रकारचे निर्बंध चीनवर लावण्यास उद्युक्त केले. अशीच परिस्थिती भारतावर उद्भवल्यास, त्यास तोंड देता यावे, म्हणून स्वदेशी उद्योगांना बळ देणे योग्य ठरेल. भारताची ग्राहक बाजारपेठ मोठी असल्यामुळे आपली अर्थव्यवस्था केवळ निर्यातीवर अवलंबून नाही. अर्थात, देशी उद्योगांना प्रोत्साहन देतानाच, त्यांना केवळ सबसिड्यांवर जिवंत ठेवणे दीर्घकाळात हानीकारकच ठरेल.

# ५२ व्या राज्यस्तरीय ज्यूदो स्पर्धेचा उद्घाटन सोहळा थाटात संपन्न

**विद्यार्थीदशेपासूनच प्रत्येकाने खेळ आत्मसात केल्यास भारत देश निरोगी युवकांचा देश बनेल.– अँड. दीपक सुळ**
**उहेझरीं यजमान लातूरच्या वेदांतचे रौप्यपदक तर स्वप्निलने पटकावले कांस्य**





लातूर :– आजचा दिवस गाजला स्वरूप, विराज, वेदांत, प्रतिक, ओंकार, अर्जुन, आर्यन, देव आणि कुश यांच्या बहारदार खेळाने.
कोणताही ऑलिम्पिक खेळप्रकार शिकल्यास शारीरिक आणि मानसिक कणखरता आपोआप येते त्याशिवाय अंगी शिस्त देखील बाणली जाते म्हणूनच खेळाचे बाळकडू बालपणापासूनच देशाच्या भावी नागरिकांना दिले गेल्यास आपला देश निरोगी आणि सुदृढ युवकांचा देश ओळखला जाईल असे प्रतिपादन अँड. दीपक सुळ यांनी केले. ते पुढे म्हणाले की युद्धकला क्रीडा प्रकारात अत्यंत शिस्त असते आणि त्यामुळे ज्यूदो खेळाचे खेळाडूना आपल्या देशाचे संरक्षण करणाऱ्या मिलिटरी आणि पॅरा–मिलिटरी फोर्सेससह पोलीस दलामध्ये देखील सेवा करण्याची संधी मिळते. खेळ शिकल्याने आरोग्यासह उत्तम भविष्याची सुनिश्चिती होते म्हणूनच या देशातील प्रत्येक बालकाने कोणतातरी खेळ शिकलाच पाहिजे असे आग्रही प्रतिपादन सुळ यांनी केले.
बार्शी रोडवरील गिरवलकर मंगल कार्यालयामध्ये पुनित बालन गृप प्रस्तूत ५२ व्या राज्यस्तरीय सबज्युनियर्स गटाच्या स्पर्धांचे आज उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य संघटनेचे अध्यक्ष आणि लोकमान्य टिळकांचे पणतू शैलेश टिळक तर योगेश गिरवलकर, सिद्धेश्वर बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती. सुत्रसंचलन डॉ. अशोक वाघमारे तर प्रास्ताविक लातूर ज्यूदोचे अध्यक्ष डॉ प्रदीप देशमुख यांनी केले.
उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर राज्य ज्यूदो संघटनेचे महासचिव दत्ता आफळे, कोषाध्यक्ष रविंद्र मेटकर, उपाध्यक्ष डॉ गणेश शेटकर, सुरेश समेळ, मुकूंद डांगे, तिलक थापा, दिनेश बागूल, राज्य तांत्रिक समितीच्या अध्यक्षा कु. दर्शना लाखाणी, सचिव योगेश धाडवे, अतुल बामनोदकर, सचिन देवळे, निखील सुवर्णा, स्पर्धा संचालक योगेश शिंदे यांसह लातूर ज्यूदो संघटनेचे सचिव आशिष क्षिरसागर, डॉ संपत साळुंके, डॉ. अशोक वाघमारे यांची उपस्थिती होती. स्पर्धांचे आयोजन महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशनतर्फ़े करण्यात आलेले असून त्यास द लातूर ज्यूदो संघटनेने सहकार्य केले आहे. १३ ते १५ वयोगटातील मुले आणि मुलींच्या स्पर्धेत २७ जिल्ह्यातील ३३४ खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे.
दरम्यान उद्घाटन कार्यक्रमावेळी राज्याचा सर्वोच्च क्रीडा सन्मान असलेल्या ज्यूदो खेळातील शिव छत्रपती पुरस्कारप्राप्त खेळाडू यशवंत दांगट, प्रसाद मोकाशी, अतुल शेलार आणि तुषार मालोदे यांच्यासह नुकतीच आंतरराष्ट्रीयपंच परीक्षा उत्तीर्ण झालेले सुरेश कनोजिया यांचा सत्कार करण्यात आला.
आज दिवसभरात मुलांच्या सर्व म्हणजे नऊ गटातील स्पर्धा झाल्या. यातील यजमान प्रेक्षकांची वाहव्वा मिळवली ती पदक विजेत्या स्वप्निल आणि वेदांताच्या खेळीने. मुंबई बरोबर ६० किलोखालील लढतीत मुंबईच्या आर्यन खरे बरोबर झालेल्या लढतीत लातूरच्या वेदांत मुंडेनी आक्रमण करत चांगली खेळी केली पण त्याला सुवर्णपदकाला गवसणी घालता आली नाही. राष्ट्रीय स्पर्धेसाठी राज्याच्या संघात स्वरूप, विराज, वेदांत, प्रतिक, ओंकार, अर्जुन, आर्यन, देव आणि कुश यांनी प्रथम क्रमांक पटकावून आपली जागा निश्चित केली. मुलांच्या गटात मुंबईने दोन सुवर्ण पदक पटकावून आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले तर द्वितीय क्रमांकावर ठाणे आणि कोल्हापूर तिसर्या क्रमांकावर राहिला.

३० किलोखालील मुले
सुवर्ण विराज तरवडे पीजेए
रौप्य शुभम भंडारी ठाणे
कांस्य यश पगारे धुळे
कांस्य अफान वर्षांनी यवतमाळ

३५ किलोखालील मुले
सुवर्ण वेदांत परदाई यवतमाळ
रौप्य विराज भगत नाशिक
कांस्य अथर्व सानप अमरावती
कांस्य आयुष चौधरी क्रीडा प्रबोधिनी

४० किलोखालील मुले
सुवर्ण प्रतिक व्यवहारे क्रीडा प्रबोधिनी
रौप्य प्रज्वल यादव कोल्हापूर
कांस्य नक्षसिंग राजपूत सांगली
कांस्य समर्थ राऊत पीजेए

४५ किलोखालील मुले
सुवर्ण ओंकार काकड छ. संभाजीनगर
रौप्य अर्जुन नरोडे क्रीडा प्रबोधिनी
कांस्य ओजस सुकळकर वर्धा
कांस्य विश्वजित घाडगे सांगली

५० किलोखालील मुले
सुवर्ण कुश पंडित ठाणे
रौप्य युवराज चौधरी नागपूर
कांस्य नीरज कांबळे सांगली
कांस्य अर्श बालापुरे यवतमाळ

५५ किलोखालील मुले
सुवर्ण स्वरूप परदेसी कोल्हापूर
रौप्य भुविक पुजारी ठाणे
कांस्य श्रेयस दंडगव्हाळ छ. संभाजीनगर
कांस्य स्वप्निल सोनवणे लातूर

६० किलोखालील मुले
सुवर्ण आर्यन खरे मुंबई
रौप्य वेदांत मुंडे लातूर
कांस्य हर्षवर्धन पाटील कोल्हापूर
कांस्य उज्वल पहारे अहिल्यानगर

६६ किलोखालील मुले
सुवर्ण अर्जुन चोडणकर मुंबई
रौप्य शौर्याजित माळी सांगली
कांस्य अथर्व मोरे पीजेए
कांस्य पार्थ साप्ते धाराशिव

६६ किलोवरील मुले
सुवर्ण देव गौतम रायगड
रौप्य मनोज चौधरी पिडीजेए
कांस्य प्रतिक मदाने सोलापूर
कांस्य तरणजीत सिंग अमरावती

# वेळीच थांबवा प्री-डायबिटीस, उत्तम पोषण थांबवू शकतो डायबिटीस वेळीच करा सुरू

तुमचे शरीर मधुमेह होण्याबाबत संकेत देत असेल आणि तुम्हाला त्याबाबत जाणीव सुद्धा नसेल तर? असेच काहीतरी प्रीडायबिटीजच्या बाबतीत घडते. शहरी व ग्रामीण भागांमधील जवळपास १५.३ टक्के व्यक्ती या आरोग्यसंबंधित आजाराने पीडित आहेत. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (आयसीएमआर)च्या मते, भारतात जवळपास १०१ दशलक्ष व्यक्तींना मधुमेह असण्याचा अंदाज आहे, जेथे २०१९ मधील ७० दशलक्ष व्यक्तींच्या तुलनेत मोठी वाढ झाली आहे. रक्तातील साखरेची पातळी काहीसी वाढलेली असते, पण मधुमेह होण्याइतकी नसते तेव्हा त्या स्थितीला प्री–डायबिटीज म्हणतात. हा आजार सहसा शांतपणे आणि कोणतीही लक्षणे दिसून न येता वाढत जातो, ज्यामुळे अनेक व्यक्तींना त्याबाबत जाणीव देखील होत नाही. योग्य माहिती आणि जीवनशैलीमध्ये काहीशा बदलांसह या आजाराचे व्यवस्थापन करणे शक्य आहे. प्रीडायबिटीजबाबत माहिती: जागरूक राहण्याचा इशारा वर्षानुवर्षे प्रीडायबिटीजकडे दुर्लक्ष होऊ शकते. थकवा, वजनातील बदल किंवा वारंवार तहान लागणे यांसारख्या सूक्ष्म लक्षणांकडे बहुतेक वेळा दैनंदिन जीवनातील तणावाचा भाग म्हणून दुर्लक्ष केले जाते. पण योग्य वेळी लक्ष न दिल्यास प्रीडायबिटीजमुळे टाइप २ मधुमेह होऊ शकतो आणि हृदयविकार, मूत्रपिंडाचे आजार व इतर गुंतागूंतींचा धोका वाढू शकतो. प्रीडायबिटीज बहुतेकदा लक्षात येत नाही, कारण त्यात क्वचितच स्पष्ट लक्षणे दिसतात. पण त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. वेळेवर, व्यावहारिक बदल जसे संतुलित पोषण, सक्रिय राहणे आणि तुमच्या उपचार करणाऱ्या डॉक्टरांशी सल्लामसलत करून विचारपूर्वक जीवनशैली निवडणे यासह व्यक्ती टाइप २ मधुमेह होण्याचा धोका कमी करू शकतात. यासंदर्भात मोठे बदल करण्याची गरज नाही, तर सातत्यता, शाश्वत आरोग्यदायी सवयी अंगिकारल्या पाहिजेत, ज्यामुळे दीर्घकाळपर्यंत तुमचे आरोग्य उत्तम राहिल, असे ॲबॉटच्या न्यूट्रिशन बिझनेसच्या मेडिकल अँड सायण्टिफिक अफेअर्सच्या संचालिका डॉ. प्रीती ठाकोर म्हणाल्या. सूक्ष्म लक्षणे, ज्याकडे दुर्लक्ष करू नये बहुतेकदा बालपण किंवा पौगंडावस्थेत दिसून येणाऱ्या टाइप १ मधुमेहाच्या तुलनेत प्रीडायबिटीज आणि टाइप २ मधुमेह हळूहळू विकसित होतो. प्रीडायबिटीज असलेल्या प्रौढ व्यक्तींमध्ये बहुतेकदा मधुमेहाची कोणतीही चिन्हे किंवा लक्षणे दिसून येत नाहीत, पण त्यांच्या रक्तातील साखरेची पातळी सामान्यपेक्षा जास्त असते. काही लक्षणे पुढीलप्रमाणे असू शकतात. थकवा: पुरेशी विश्रांती घेतल्यानंतरही थकवा जाणवणे, ज्यामुळे शरीर उर्जेसाठी ग्लुकोजचा कार्यक्षमतेने वापर करत नाही. अस्पष्ट वजन बदल: शरीराच्या ग्लुकोज प्रक्रिया करण्याच्या पद्धतीत बदल झाल्यामुळे काही व्यक्तींना अनपेक्षित वजन वाढणे किंवा कमी होणे जाणवू शकते.हळू बरे होणाऱ्या जखमा: रक्तातील सामान्यपेक्षा जास्त साखरेची पातळी रक्तप्रवाह आणि रोगप्रतिकारशक्तीवर परिणाम करू शकते. लवकर निदान आणि जीवनशैलीत बदल केल्यास टाइप २ मधुमेह होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. प्रीडायबिटीजच्या विकासात आणि प्रतिबंधात आहाराची भूमिका: आहारसंबंधित सवयी प्रीडायबिटीज वाढतो की नियंत्रणात येतो यामध्ये महत्त्वाच्या भूमिका बजावतात. रिफाइंड साखर, संतृप्त फॅट्स आणि अधिक प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ असलेल्या आहाराच्या सेवनामुळे शरीर इन्सुलिनला कमी प्रतिसाद देऊ शकते, ज्यामुळे कालांतराने रक्तातील साखरेची पातळी वाढते. पण, चांगली बातमी आहे? लक्ष्यित आहारातील बदलांसह जीवनशैलीतील बदल टाइप २ मधुमेह होण्याला प्रतिबंध किंवा विलंब करू शकतात. संतुलित, संपूर्ण अन्न–आधारित आहार ग्लुकोज व्यवस्थापनास साह्य करतो, चयापचय वाढवतो आणि तुम्हाला जास्त काळ पोट भरल्यासारखे वाटण्यास मदत करतो. प्रीडायबिटीजसह निदान झाले असल्यास त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी काय करावे याबाबत मार्गदर्शन पुढे देण्यात आले आहे:कमी ग्लायसेमिक इंडेक्स असलेले खाद्यपदार्थ निवडा: संपूर्ण धान्य, शेंगा, स्टार्च नसलेल्या भाज्या आणि सफरचंद किंवा पेअर सारखी फळे सेवन करा. हे रक्तप्रवाहात हळूहळू ग्लुकोज सोडण्यास मदत करतात. फायबरचे सेवन वाढवा: इन्सुलिन संवेदनशीलता सुधारण्यासाठी दररोज २५–३० ग्रॅम भाज्या, साल असलेली फळे, संपूर्ण धान्ये आणि बियांचे सेवन करा. लीन प्रोटीन व आरोग्यदायी फॅट्स समाविष्ट करा: मसूर, अंडी, टोफू, मासे, काजू व ॲवोकॅडो भूकेचे शमन करण्यास आणि उर्जेची पातळी स्थिर करण्यास मदत करतात. साखरयुक्त पेये आणि प्रक्रिया केलेले कार्बोहायड्रेट्स कमी करा: सॉफ्ट ड्रिंक्स (शीतपेये), मिठाई आणि व्हाइट ब्रेडऐवजी आरोग्यदायी व फायबरयुक्त पर्यायांना प्राधान्य द्या. सेवनावर नियंत्रण ठेवा: पौष्टिक अन्न देखील जास्त प्रमाणात खाल्ल्यास रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते. योग्य प्रमाणात सेवन करा, पॅकेट्सवरील लेबल वाचा आणि एकाच वेळी दोनदा आहार सेवन करणे टाळा.

संतुलित आहाराचे सेवन उत्तम आहे, पण आधुनिक काळातील जीवनशैलीमध्ये ते सहजपणे मिळणे शक्य नाही. डायबिटीज–स्पेसिफिक न्यूट्रिशन (डीएसएन) उत्पादने ही कमतरता भरून काढण्यात मदत करू शकतात. ही उत्पादने आवश्यक प्रमाणात मोठे (मॅक्रो) व सूक्ष्म (मायक्रो) पोषक घटक देतात, तसेच रक्तातील साखरेच्या पातळीवर नियंत्रण ठेवतात. लवकर व्यवस्थापन महत्त्वाचे आहे:प्रीडायबिटीजचे व्यवस्थापन रक्तातील साखरेच्या पातळीवर नियंत्रण ठेवण्यासह एकूण आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी आणि दीर्घायुष्यासाठी महत्त्वाचे आहे.

## गणपतीच्या प्रसादासाठी घरी नक्की बनवा तोंडात टाकताच विरघळणारे बेसनाचे लाडू; जाणून घ्या पारंपरिक रेसिपी

गणेशोत्सव हा आपल्या महाराष्ट्रातील सर्वांत मोठा आणि अत्यंत प्रिय सण आहे. या सणाच्या दिवशी घराघरात गणेशाची पूजा केली जाते आणि विविध प्रकारच्या पदार्थांची तयारी केली जाते. विशेषत: लाडू हे गणेश भक्तीचे प्रतीक आहेत. 'लाडू' हा शब्द जरी प्रत्येक प्रकारच्या मिठाईसाठी वापरला जातो, तरी महाराष्ट्रातील बेसन लाडूची चव आणि परंपरा ही काही वेगळीच असते.

गणेशोत्सवाच्या दिवशी या बेसन लाडूचे महत्व खूप आहे. गणपती बाप्पा आपल्या भक्तांना आशीर्वाद देण्यासाठी घराघरात येतात आणि त्यांचे स्वागत विविध खाद्य पदार्थांनी केले जाते. या लाडूंमध्ये केवळ मिठास नाही तर ते प्रेम, भक्ती आणि कुटुंबाच्या एकतेचे प्रतीक देखील आहेत. गणेश पूजनादरम्यान लाडू बाप्पाला अर्पित करून, आपल्या घरात सुख–शांती आणि समृद्धीची कामना केली जाते. हे लाडू अगदी सोप्या पद्धतीने तयार होतात, मात्र त्यांची चव अत्यंत लाजवाब असते. ही चव मानला इतकी मंत्रमुग्ध करणारी असते की लहानच काय तर मोठ्यांचाही यावर ताबा राहत नाही. अशात सणाच्या गोड प्रसंगी हे खास लाडू घरी बाणायलाच हवेत. चला नोट करूयात यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य:
२ कप बेसन (चटणी बेसन)
१ कप साखर
१/२ कप तूप (सर्वश्रेष्ठ चवीसाठी शुद्ध तूप वापरा)
१/४ चमचा वेलची पावडर
१/४ कप ताजे ताजे काजू, बदाम किंवा पिस्ता (काटलेले)
१/२ कप दूध (आवश्यकतेनुसार)
१/४ चमचा शंभर पाणी (तूप लावण्यासाठी)

कृती: यासाठी सर्वप्रथम एका मोठ्या कढईत १/२ कप तूप घ्या आणि ते मध्यम आचेवर गरम करा. तूप पूर्णपणे वितळल्यावर त्यात बेसन घाला.

बेसन घालून कधीच विसरू नका आणि ते हलवत राहा. बेसन हलके गुलाबी रंग होईपर्यंत आणि त्यातून चांगली वास येईपर्यंत भाजा. यासाठी साधारणत: १०–१५ मिनिटे लागतात.

बेसन भाजताना त्यात तूप भरपूर असावे लागते, त्यामुळे लाडू खुसखुशीत होतात.

बेसन छान भाजल्यावर त्यात साखर घाला. साखर घातल्यावर मिश्रण गुळगुळीत होईल. त्यात गाळलेले दूध टाका. दूध घालण्याचा उद्देश हे बेसन लाडू एकसारखे

राहण्यासाठी आणि चवदार होण्यासाठी आहे.

वेलची पावडर घालून, तुम्हाला हवे असल्यास ताजे तुकड्य केलेले काजू, बदाम किंवा पिस्ता घालून मिश्रण नीट मिसळा. त्यामुळे लाडूला एक वेगळाच खुसखुशीत चव येईल.

जेव्हा मिश्रण थोडे थंड होईल, तेव्हा आपल्या हातांच्या साह्याने लाडूंचे आकार करा. आपल्या आवडीनुसार लाडूचे आकार छोटे किंवा मोठे असू शकतात.

बेसन लाडू तयार झाल्यावर त्यांना पूर्णपणे थंड होऊ द्या. एकदाचे ते थंड झाल्यावर, ते चविष्ट आणि हलके तयार होतील.

बेसन जितके चांगल्या प्रकारे भाजले जाईल, तितके लाडू खुसखुशीत आणि स्वादिष्ट होतील.

लाडू ठेवण्यासाठी आपल्याकडे एअरटाइट कंटेनर ठेवा, त्यामुळे ते ताजे राहतील.

वेलची पावडर आणि ड्रायफ्रूट्स हे तुमच्या आवडीप्रमाणे कमी किंवा अधिक करू शकता.

# बिहारच्या कटिहारमध्ये राहुल गांधी पाण्यात उतरले:मखान्याची शेती पाहिली, शेतकऱ्यांना भेटून समस्या जाणून घेतल्या; कार्यकर्त्यांशी हस्तांदोलन केले

शनिवारी बिहारमधील मतदार हक्क यात्रेचा ७ वा दिवस आहे. राहुल गांधी आणि तेजस्वी यादव सकाळी कटिहारमधील सिमरिया येथे पोहोचले. येथे राहुल मखान्याची लागवड पाहण्यासाठी गुडघ्यापर्यंत पॅन्ट ओढून तलावात उतरले. शेतकऱ्यांकडून त्यांना मखान्याच्या बिया कशा लावल्या जातात हे समजून घेतले.
येत्या काळात काँग्रेसचे अनेक मोठे नेते मतदार हक्क यात्रेत सामील होतील. प्रियंका गांधी २६–२७ ऑगस्ट रोजी होणाऱ्या या यात्रेचा भाग असतील.
ट्विटरवर याबद्दल माहिती देताना काँग्रेस नेते वेणुगोपाल यांनी लिहिले की, 'मतदार हक्क यात्रा ही मत चोरीविरुद्धची एक ऐतिहासिक चळवळ बनली आहे, जी केवळ बिहारमधूनच नव्हे तर संपूर्ण भारतातील लोकांना आकर्षित करत आहे.
येत्या आठवड्यात, भारतातील आणि काँग्रेसमधील प्रमुख नेते या यात्रेत सामील होतील. प्रियंका गांधी २६–२७ ऑगस्ट रोजी, तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन २७ ऑगस्ट रोजी, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या २९ ऑगस्ट रोजी, उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव ३० ऑगस्ट रोजी या यात्रेत सामील होतील.
याशिवाय, येत्या काळात झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखू सुखविंदर आणि वरिष्ठ विरोधी नेते देखील सामील होतील.
मतदार हक्क यात्रेशी संबंधित काही छायाचित्रे....
कुर्सेलाहून सिमरियाला पोहोचली यात्रा
शनिवारी सकाळी ८ वाजता कुर्सेला चौकातून सुरू झालेली मतदार हक्क यात्रा समेली, डूमर आणि गेडाबाढी मार्गे कोढ्ढा विधानसभा मतदारसंघातील सिमरिया येथे पोहोचली. येथे एक तासाचा जेवणाचा ब्रेक असेल.
यानंतर, दुपारी ४ वाजता कारगिल चौकातून पुन्हा यात्रा सुरू होईल. ही यात्रा आंबेडकर चौक, मोंगरा फाटक चौक, दांडखोरा आणि सौनाली मार्गे कडवा कुंभारी येथे पोहोचेल.
राहुल गांधी सायंकाळी ७:३० वाजता येथे एका जाहीर सभेला संबोधित करतील. त्यानंतर ताफा पूर्णिया जिल्ह्याकडे रवाना होईल.
'मत चोर महाराज बिहारमध्ये आले होते'
शुक्रवारी, मतदार हक्क यात्रेच्या सहाव्या दिवशी, राहुल गांधी भागलपूरला पोहोचले. येथे घंटा घर चौकात, राहुल गांधी म्हणाले, 'सरकारने सामान्य लोकांसाठी सर्व रस्ते बंद केले आहेत. पूर्वी, ओबीसींना दडपले जात होते. तुम्हाला संधी दिली जात नव्हती.'
राहुल गांधींनी सभेच्या मध्यभागी संविधान पुस्तक मागितले आणि नंतर म्हणाले, 'संविधान स्वातंत्र्यानंतर बनवले गेले. त्यात लिहिले आहे की भारतातील सर्व लोक समान आहेत. संविधान प्रत्येक व्यक्तीला एक मत देण्याचे स्वातंत्र्य देते. एक माणूस एक मत, पण पंतप्रधान मोदी आणि निवडणूक आयोग मिळून तुमचे मत चोरत आहेत.'
पंतप्रधानांवर टीका करताना ते म्हणाले, 'वोट चोर महाराज बिहारमध्ये आले होते.'
रॅलीदरम्यान वीज नसताना राहुल गांधी म्हणाले, 'पाहा, वीज कापली गेली आहे, पण वीज कापून आवाज दाबता येणार नाही. आम्ही बिहारमध्ये एकही मत चोरीला जाऊ देणार नाही, हे येथील लोकांनी मतदार हक्क यात्रेत सिद्ध केले आहे.'
तेजस्वी यादव म्हणाले, 'राहुल गांधींनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पंतप्रधान मोदी देत नाहीत. तेजस्वी यादव म्हणाले, नितीश मागे हटतात, ही त्यांची शेवटची निवडणूक आहे. मी लेखी स्वरूपात देतो की आता नितीश कुमार बिहारचे मुख्यमंत्री होणार नाहीत, भाजप त्यांच्याकडून हिशेब चुकता करेल.'
यापूर्वी, मुंगेरच्या घोरघाटमध्ये, स्थानिक लोक राहुल–तेजस्वी यांच्यावर संतप्त असल्याचे दिसून आले होते. प्रत्यक्षात, घोरघाटमध्ये भीमराव आंबेडकरांच्या २० फूट उंच पुतळ्याचे अनावरण होणार होते. त्यासाठी तयारीही करण्यात आली होती.
मतदार हक्क यात्रेदरम्यान कटिहारमध्ये काँग्रेसची पत्रकार परिषद
मतदार हक्क यात्रेदरम्यान काँग्रेस नेते इम्रान प्रतापगढी यांनी कटिहारमध्ये माध्यमांना संबोधित केले. ते म्हणाले, राहुल गांधींनी निवडणूक आयोगाच्या अनियमितता उघड केल्या. चौकशी करण्याऐवजी आयोग प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास सांगत आहे. बिहारमध्ये लोकांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला जात आहे.
राहुल यांनी कटिहारमध्ये पप्पू यादव यांची भेट घेतली
राहुल यांनी कटिहारमध्ये पप्पू यादव यांची भेट घेतली मतदार हक्क यात्रेत राहुल गांधींसोबत असलेले पूर्णियाचे खासदार पप्पू यादव यांनी शनिवारी राहुल गांधी यांची भेट घेतली. कटिहारमधील या भेटीचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये दोघेही हस्तांदोलन करताना दिसत आहेत.
पप्पू यादव म्हणत आहेत, 'हा माझा संसदीय मतदारसंघ आहे.' राहुल गांधींनी विचारले, 'कसे आहात?'
अखिलेश सिंह म्हणाले – निवडणूक चोरण्याचा थेट प्रयत्न होत आहे
पत्रकार आशिष राय यांनी मतदार हक्क यात्रेबाबत काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष अखिलेश सिंह यांच्याशी संवाद साधला. ते म्हणाले, पूर्वी हे लोक आमदार खरेदी करायचे, आता निवडणूक चोरण्याचा कट रचला जात आहे. पूर्वी निवडणूक आयोग कधीही पत्रकार परिषद घेत नव्हता, आता ते स्पष्टीकरण का देत आहे.
मतदान चोर महाराज बिहारमध्ये आले होते
शुक्रवारी, मतदार हक्क यात्रेच्या सहाव्या दिवशी, राहुल गांधी भागलपूरला पोहोचले. येथे घंटा घर चौकात, राहुल गांधी म्हणाले, 'सरकारने सामान्य लोकांसाठी सर्व रस्ते बंद केले आहेत. पूर्वी, ओबीसींना दडपले गेले. तुम्हाला संधी दिली गेली नाही.'



राहुल गांधींनी सभेच्या मध्यभागी संविधान पुस्तक मागितले आणि नंतर म्हणाले, 'संविधान स्वातंत्र्यानंतर बनवले गेले. त्यात लिहिले आहे की भारतातील सर्व लोक सारखे आहेत. संविधान प्रत्येक व्यक्तीला एक मत देण्याचे स्वातंत्र्य देते. एक माणूस एक मत, परंतु पंतप्रधान मोदी आणि निवडणूक आयोग मिळून तुमचे मत चोरत आहेत.
त्यांनी पंतप्रधानांवर टीका केली आणि म्हणाले, 'मत चोर महाराज बिहारमध्ये आले होते.' सभेदरम्यान वीज नसताना राहुल गांधी म्हणाले, 'पाहा, वीज कापली गेली आहे, परंतु वीज कापून आवाज दाबता येणार नाही. आम्ही बिहारमध्ये एकही मत चोरी होऊ देणार नाही, येथील लोकांनी मतदार हक्क यात्रेत हे सिद्ध केले आहे.'
राजेश राम म्हणाले– बिहारच्या लोकांनी त्यांचे मत चोरीला गेल्याचे मान्य केले आहे
मतदार हक्क यात्रेबाबत दैनिक भास्करने प्रदेशाध्यक्ष राजेश राम यांच्याशी संवाद साधला. ते म्हणाले, 'बिहारच्या लोकांनी त्यांचा मतदानाचा अधिकार चोरीला गेल्याचे मान्य केले आहे.'
दुसरीकडे, तेजस्वी यांच्याविरुद्ध दाखल केलेल्या एफआयआरवर ते म्हणाले, 'ही लोकशाहीची हत्या आहे.'
राहुल यांचा ताफा कटिहार मार्गे पूर्णियाला जाईल
राहुल यांचा ताफा कटिहारमधील सिमरिया येथून कडवा कुम्हारी येथे पोहोचेल. संध्याकाळी तेथे एक जाहीर सभा होईल. येथून यात्रा पूर्णिया जिल्ह्यात प्रवेश करेल.
राहुल गांधींनी मखाना लावा चाखला
कटिहारमध्ये राहुल गांधींनी मखाना शेती करणाऱ्या कामगारांशी हस्तांदोलन केले. त्यांनी त्यांची विचारपूस केली. यादरम्यान त्यांनी दरभंगाहून आलेल्या मखाना फोरी कामगारांशीही संवाद साधला, त्यांच्या समस्या ऐकल्या आणि त्यांना उपाय करण्याचे आश्वासन दिले.
राहुल गांधींनी कामगारांचे काम जवळून पाहिले आणि सीमांचलची ओळख असलेल्या मखाना लावाचाही आस्वाद घेतला.
तेजस्वी एफआयआरवर म्हटले– मी कोणाला घाबरत नाही
तेजस्वी यादव म्हणाले, एफआयआरला कोण घाबरतो? 'जुमला' हा शब्द बोलणे देखील गुन्हा बनला आहे. ते सत्य बोलण्यास घाबरतात. आम्हाला कोणत्याही एफआयआरची भीती वाटत नाही आणि आम्ही सत्य बोलतो.
राहुल गांधी गुडघ्यापर्यंतच्या पाण्यात मखाना शेती पाहण्यासाठी गेले
कटिहार येथील त्यांच्या भेटीदरम्यान, राहुल गांधी गुडघ्यापर्यंतच्या पाण्यात जाऊन मखाना शेती पाहिली. त्यांनी मखाना शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी प्रदेशाध्यक्ष राजेश राम हे देखील राहुल गांधींसोबत तलावात उतरले.
शकील अहमद म्हणाले – १००० एफआयआर झाले तरी काही फरक पडत नाही
काँग्रेस नेते शकील अहमद खान म्हणाले, हजार एफआयआर नोंदवले तरी काय फरक पडतो? ही यात्रा भाजपच्या विचारांपासून मुक्तता मिळवण्यासाठी आहे. आम्ही आमचे ध्येय साध्य करू. आम्ही मते चोरीला जाऊ देणार नाही.
लोक म्हणाले– राहुलला भेटायला आले होते, पण ते थांबले नाहीत
महागठबंधन समर्थक आणि लोक सकाळी ८ वाजल्यापासून कुर्सेला शहीद चौकात राहुल–तेजस्वी यांना पाहण्यासाठी जमले होते.

# येवता जिल्हा परिषद शाळेत गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडस्कर यांच्या हस्ते शौचालय इमारतीचे उद्घाटन संपन्न

### आवादा फाउंडेशनच्या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून होतेय कौतुक



केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील येवता येथील जिल्हा परिषद शाळेत गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडस्कर यांच्या हस्ते शौचालय इमारतीचे उद्घाटन संपन्न झाले आहे तर आवादा फाउंडेशनच्या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील येवता येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत गेल्या सहा ते सात महिन्यापासून आवादा फाउंडेशनच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे यामध्ये समर व्हेकेशन तसेच वृक्ष लागवड व शाळेला शौचालय बांधकाम इत्यादी गोष्टीवर आपले लक्ष केंद्रित न करता शाळेतील छोट्या मोठ्या बाबीवर लक्ष वेधून शाळेच्या संगणक शिक्षक, गणित, इंग्रजी विषयाचे शिक्षकही खाजगी देण्याचे आवादा फाउंडेशनच्या वतीने प्रयत्न सुरू आहेत. येत्या काही दिवसात उ मागणी ही पूर्ण केली जाईल असे आवादा फाउंडेशनचे दीपक जेना यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले.

यावेळी सरपंच विलास आप्पा जोगदंड यांनी आवादा कंपनीचे आभार मानले व यापुढेही आपले कार्य असेच चालू राहावे अशी विनंती केली तर सयाजी पाटील यांनी आवादा कंपनीचे आभार व्यक्त करत त्यांनी दिलेल्या वास्तूचा वापर चांगल्या प्रकारे करावा जेणेकरून आपण आपल्या घरच्या सारखे ही वास्तू चांगली ठेवावी अशी विद्यार्थांना विनंती केली. या कार्यक्रमाचे उद्घाटक गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडस्कर यांनी बोलताना आवदा फाउंडेशनच्या वतीने घेतलेल्या उपक्रमाचे कौतुक केले व पुढे बोलताना बिडकर म्हणाले की, केज तालुक्यातील अनेक शाळेला काही ना काही देऊन जिल्हा परिषद शाळेला आवादा फाउंडेशनच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आधार मिळाला आहे यापुढेही आवादा फाउंडेशनने असेच सहकार्य करावे असे लक्ष्मण बेडस्कर यांनी मत व्यक्त केले.

याकार्यक्रमाचे समारोप अशोक जोगदंड सर यांनी केला. यावेळी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडस्कर,येवता गावचे सरपंच विलास आप्पा जोगदंड, उपसरपंच बाळासाहेब सक्राते,सयाजी पाटील, पत्रकार वसंत सोनवणे, मुख्याध्यापक श्री शिंदे सर,जाधव सर,केदार सर, अशोक जोगदंड सर,रूद्रे सर,सतिष जोगदंड सर, अंबादास काळे सर, कोकाटे मॅडम,व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेच्या २९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे २४ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजन

लातूर दि.२३-०८-२०२५ राज्यासह मराठवाड्यातील बँकींग क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी करून नावलौकिक मिळविलेल्या महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेची २९ वी वार्षीक सर्वसाधारण सभा २४ ऑगस्ट २०२५ रोजी रविवारी सकाळी ११ वा.जेएसपीएम संस्थेअंतर्गत येणार्या स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक सभागृह एमआयडीसी, लातूर येथे संपन्न होणार आहे. महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेची गेल्या एकोणतीस वर्षापासून यशस्वी वाटचाल सुरू आहे. हे बँकेच्या कार्यावरून समोर आलेले आहे. बँकेच्या यशस्वी वाटचालीबद्दल महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेला राज्य व राष्ट्रीय स्तरावरील अनेक पारितोषिके मिळालेली आहे. या बँकेची २९ वी वार्षीक सर्वसाधारण सभा २४ ऑगस्ट २०२५ रोजी होणार आहे.



या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षस्थानी एमएनएस बँकेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर हे उपस्थित राहणार आहेत. तसेच बँकेचे उपाध्यक्ष एस.आर.मोरे यांच्यासह सर्व संचालक मंडळाचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे २४ ऑगस्ट २०२५ रोजी होणार्या या एमएनएस बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला सर्व सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेचे प्रभारी कार्यकारी संचालक नितीन सराफ यांनी केलेले आहे.

# आत्माराम वाव्हळ यांना 'जननेता सन्मान २०२५ पुरस्कार' जाहीर; सर्व स्तरातून होतोय अभिनंदनाचा वर्षाव..!

### १५ ऑक्टोबर रोजी मान्यवरांच्या हस्ते होणार वितरण!

बीड/प्रतिनिधी सायं दैनिक जननेताच्या प्रथम वर्धापन दिना निमित्ताने माजी सैनिक सोपानराव दादा गायकवाड यांच्या स्मरणार्थ विविध क्षेत्रातील उल्लेखनिय कार्य करणार्या गुणवंत व्यक्तींना जननेता सन्मान २०२५ पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष तथा शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचे श्री आत्माराम वाव्हळ सर यांची निवड करण्यात आली आहे. सदर निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



सायं दैनिक जननेताच्या प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्ताने माजी सैनिक सोपानराव दादा गायकवाड यांच्या स्मरणार्थ विविध क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या गुणवंत व्यक्तींना जननेता सन्मान २०२५ हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानीत केले जाणार आहे. या मध्ये विद्यार्थ्यांना घडविण्याचे व ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत असताना पत्रकारितेच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक कार्यात सदैव सहभागी असणारे राज्यातील विना अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनासह इतर प्रश्नावर सातत्याने लढा देणारे महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष तथा शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचे आदर्श शिक्षक, मुख्याध्यापक तसेच आदर्श पत्रकार, संपादक या विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले श्री आत्माराम वाव्हळ यांनी केलेल्या शैक्षणिक, सामाजिक आणि पत्रकारितेच्या माध्यमातून केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांची जननेता सन्मान २०२५ या पुरस्कारासाठी करण्यात आल्याची माहिती निवड समितीचे प्रमुख संपादक नंदू गायकवाड यांनी दिली. सदर पुरस्काराचे वितरण दि. १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११-०० वाजता आयोजित करण्यात आलेल्या भव्य दिव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. सदरील दैनिक जननेता सन्मान २०२५ पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री आत्माराम वाव्हळ सर यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्याहस्ते भारतीय हॉकी संघात निवड झालेल्या व्यंकटेश केंचे यांचा सत्कार

लातूर दि.२३-०८-२०२५ लातूर जिल्ह्याचे सुपुत्र तथा चाकूर तालुक्यातील घरणी येथील व्यंकटेश धनंजय केंचे यांचे भारतीय हॉकी संघात युरोप दौर्यासाठी निवड झालेली आहे. त्याबद्दल भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्याहस्ते शाल, पुष्पगुच्छ व फेटा देऊन सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



यावेळी भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रामचंद्र तिरूके, भाजपाचे रविशंकर लवटे, विजय केंचे, अॅड.किरण चिंते, डॉ.ज्ञानेश्वर चिंते, लाविनाजी केंचे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

०८ जुलै २०२६ ते २० जुलै २०२६ दरम्यान तेरा दिवसाचा व्यंकटेश केंचे यांचा दौरा आहे. या दौर्यामध्ये आयर्लंड, नेदरलंड, बेल्जियम, फ्रान्स आणि अर्जेटिना येथे होणार्या आंरराष्ट्रीय सामन्यामध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी व्यंकटेश केंचे यांना मिळणार आहे. व्यंकटेश केंचे यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर आणि उत्कृष्ठ खेळ कौशल्याच्या बळावर मोठी कामगिरी करून आपल्या कुटुंबाचे व लातूर जिल्ह्याचे नाव देशात उज्वल करण्याचे काम केलेले आहे.

त्यांच्या या कार्यामुळे लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील तरूणांसमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण झालेला आहे. त्यांच्या झालेल्या या निवडीबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राख्यांच्या माध्यमातून विकसीत व सुरक्षित महाराष्ट्र निर्मितीसाठी बळ मिळेल - अजित पाटील कव्हेकर लातूर शहर जिल्ह्यातून संकलित १९१०० राख्या मुंबईकडे रवाना

लातूर प्रतिनिधी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विकसीत आणि सुरक्षित महाराष्ट्र करण्यासाठी अथक परिश्रम करत असून त्यांच्या या परिश्रमाला लाडक्या बहिणींकडून पाठवण्यात आलेल्या राख्यांच्या माध्यमातून अधिकचे बळ मिळेल असा विश्वास व्यक्त करून लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी विकसीत महाराष्ट्रात लाडक्या बहिणींचे योगदान अधिकचे असेल, असे प्रतिपादन केले.

भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी एक राखी लाडक्या देवाभाऊंसाठी हे अभियान राबवण्यात आलेले आहे. या अभियानांतर्गत लातूर शहर जिल्ह्यातून १९१०० राख्यांचे संकलन करण्यात आलेले होते. या राख्या मुंबईकडे रवाना करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात अजित पाटील कव्हेकर बोलत होते. यावेळी महिला मोर्चा अध्यक्षा तथा अभियान संयोजक रागिणी यादव, सहसंयोजक अॅड.गणेश गोजमगुंडे, मंडल अध्यक्ष निर्मला कांबळे, राहूल भुतडा, सुरेश जाधव, काकासाहेब चौगुले, रोहित पाटील, अमोल गित्ते, माजी नगरसेविका श्वेता लोंढे, निखील गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती.

महिला सक्षमीकरणासाठी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून विविध योजनांवर भर दिला जात असल्याचे सांगून अजित पाटील कव्हेकर यांनी या योजनांचा प्रवास बेटी बचाव बेटी पढाओ येथून सुरु होऊन लखपती दिदी या योजनेपर्यंत पोहचलेला आहे. लखपती दिदी योजनेंतर्गत अद्यापपर्यंत ५० लाख महिला लखपती झाल्या असून यावर्षी ५० लाख महिलांना लखपती दिदी बनवण्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला असल्याचे सांगितले. विकसीत अर्थव्यवस्थेसाठी लैंगिक समानता महत्वाची आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून जातीभेद आणि लिंगभेद समाप्त करून व्यक्तीच्या रूपाने सर्वांना समान संधी आणि अधिकार प्राप्त करून दिले आहे. त्यामुळेच महिलांचे शिक्षण, रोजगार हे केवळ अधिकार राहिलेले नसून आर्थिक परिवर्तनाच्या उपक्रमासाठी हे आवश्यक असल्याचेही अजित पाटील कव्हेकर यांनी स्पष्ट केले. त्यामुळेच महिला सक्षमीकरणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील केंद्र व राज्य सरकार सातत्याने नाविन्यपूर्ण योजना आणि उपक्रम हाती घेत आहे. यापुर्वी लाडकी बहिण योजनेंतर्गत महाराष्ट्रातील कोट्यावधी महिलांना दर महिना मदत मिळत असून लातूर शहरातीलही ८८००० महिलांना दरमाह १५०० रुपयांचे अर्थसहाय्य मिळत आहे. त्याचबरोबर केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ शहरातील महिलांना मिळत असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रति कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यासाठी शहरातून १९१०० राख्यांचे संकलन व शुभेच्छा संदेश दिले असल्याचे अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले आहे. या राख्या आणि शुभेच्छा संदेशामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विकसीत व सुरक्षित महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी बळ मिळेल, असा विश्वास अजित पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केला.



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला मोर्चा अध्यक्षा तथा अभियान संयोजक रागिणी यादव यांनी केले. यावेळी उपस्थित महिला पदाधिकाऱ्यांनी जिल्हाध्यक्ष यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांना राखी बांधून औक्षण केले. यानंतर संकलित केलेल्या राख्या मुंबईकडे रवाना करण्यात आल्या. या कार्यक्रमास मुन्ना हाश्मी, अॅड. किशोर शिंदे, अॅड.विजय आवचारे, पुरुषोत्तम सोनी, किशोर काळे, अॅड.वैशाली लोंढे, रविशंकर लवटे, हेमा येळे, रोहिणी देशमुख, सीमा करपे, लता घायाळ, प्रभा जाणते, राधिका लोखंडे, सुमनश्री राठोड, गणेश मिरकले, अतिश कांबळे, गणेश कसबे, राजन सोनवणे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमित ठाकरेंनी आशिष शेलारांची घेतली भेट, काय केल्या मागण्या? मुंबईत नेमकं काय घडलं?

मुंबई : महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांनी आज (२३ ऑगस्ट) सकाळी ९:३० वाजता वांद्रे येथील भाजप नेते आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या कार्यालयात भेट घेतली. या भेटीत अमित ठाकरे यांनी गणेशोत्सवाच्या ११ दिवसांच्या कालावधीत (२७ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर २०२५) शाळा आणि महाविद्यालयीन परीक्षा रद्द करून पुढे ढकलण्याची मागणी केली.



यासंदर्भात त्यांनी शेलार यांना एक पत्रक सादर केले, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना सांस्कृतिक आणि सामाजिक उत्सवात सहभागी होण्याची संधी मिळावी, यासाठी ठाम भूमिका मांडली आहे.

काय आहेत मागण्या?

सर्व शाळा (SSC, CBSE, ICSE, CISCE, IB, IGCSE, MIEB, NIOS बोर्ड), महाविद्यालये (राज्य, अभिमत, खासगी विद्यापीठे आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्था) यांना सांस्कृतिक मंत्रालयामार्फत तातडीने आदेश जारी करावेत की, गणेशोत्सवाच्या कालावधीत (गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशी) कोणत्याही परीक्षांचे आयोजन करू नये. निश्चित केलेल्या परीक्षा तात्काळ रद्द करून पुढे ढकलाव्यात.

गणेशोत्सवात परीक्षा घेणाऱ्या विद्यापीठे आणि महाविद्यालयांवर तातडीने कारवाई करावी.

गणेशोत्सवात विद्यार्थ्यांना मनापासून सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून त्यांचा सांस्कृतिक वारसाशी संबंध जपला जाईल.

अमित ठाकरे यांचा इशारा अमित ठाकरे यांनी ठाम भूमिका घेत सांगितले की, गणेशोत्सव हा केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक दृष्ट्याही महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबासह आणि समाजासह या सणाचा आनंद घ्यावा, ही त्यांची संस्कृतीशी नाळ जपण्याची जबाबदारी आहे.

# पत्रकार : विष्णू बुरे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा






नवी मुंबई / के. एच. हनवते :- दैनिक समर्थ गावकरीचे मंत्रालय प्रतिनिधी व धडाडीचे पत्रकार : विष्णु बुरे यांचा वाढदिवस क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सामाजिक संस्था, सेक्टर २१ तुर्भे सेंटर येथे अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. या अभिष्टचिंतन सोहळ्यास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सरचिटणीस व दैनिक समर्थ गावकरी मुख्य संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, तसेच समाजसेवक : नानजी भाई ठक्कर आणि नवी मुंबई विभागीय संपादक, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : दशरथ चव्हाण इत्यादी मान्यवर उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ नवी मुंबई सदस्य व दैनिक महावृत्त सहसंपादक : कल्याणराव हनवते यांनी कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून देशाचा सर्वात मोठा ग्रंथ भारताचे संविधान व शाल पुष्पगुच्छ देऊन धडाडीचे पत्रकार : विष्णु बुरे यांना वाढदिवसाच्या मंगलमय हार्दिक हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यावेळी शुभेच्छा पर बोलताना दैनिक महावृत्ताचे सहसंपादक व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सदस्य के. एच. हनवते म्हणाले की, लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून आज पत्रकराकडे पाहिले जाते आणि म्हणून पत्रकाराने निर्भीड आणि आपल्या झुंजार लेखणीतून जनतेचा आवाज मंत्रालयापर्यंत पोहोचण्याचे कार्य विष्णू बुरे हे निर्भीड पणे करत आहेत त्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे. या भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सामाजिक संस्था सेक्टर २१ तुर्भे सेंटर येथे करण्यात आले होते, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या सामाजिक संस्थेच्या महिलांना साडी वाटप तसेच लहान बालक, बालीका यांना शालीय साहित्य नोटबुक वाटप करण्यात आले. त्यावेळी नवी मुंबईतील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE